# NATIONALIST DETECTIVE FORCE



(organized by SNDF Support Services Pvt.Ltd)

कार्यालय पत्ता :- ऑफिस क्र. २५, बेसमेंट, गणेश चेंबर, कर्वे रोड, एरंडवणे, पुणे, महाराष्ट्र ४११००४
ई-मेल:-ndfdetective@gmail.com हेल्पलाईन नं.:- 8007341905

## नॅश्नलिस्ट डिटेक्टिव्ह फोर्स मार्फ़त एकूण ६१४ पदे भरती २०२५

दिनांक : १२/०२/२०२५

नॅश्नलिस्ट डिटेक्टिव्ह फोर्स भरती 2025: खालील प्रमाणे सुरक्षा रक्षक, सुरक्षा रक्षक राखीव, सुरक्षा रक्षक अधिकारी या पदांसाठी कंत्राटी पद्धतीने २०२५ मध्ये ४०२ पेक्षा जास्त जागांची भरती प्रक्रिया होत आहे. या भरतीसाठी संपूर्ण महाराष्ट्रातुन किमान १० वी पास व पुढे शिक्षण पूर्ण पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया १५ फेब्रुवारी २०२५ पासून सुरु झालेली आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी ~~१५ मार्च २०२५~~ २० एप्रिल २०२५ या तारखेपर्यंत आपल्या अर्जाची नोंदणी करावी.

**भरती जाहिरात:**

| विभाग | नॅश्नलिस्ट डिटेक्टिव्ह फोर्स |
|---|---|
| एकूण जागा | ६१४ पदे |
| पदांची नावे | सुरक्षा रक्षक, सुरक्षा रक्षक राखीव, सुरक्षा रक्षक अधिकारी. |
| नोकरी ठिकाण | महाराष्ट्र, भारत. |

**पदे आणि पदांची संख्या:**

| पद क्रमांक | पदाचे नाव | एकूण पदे |
|---|---|---|
| पद क्र. १ आणि पद क्र. २ | सुरक्षा रक्षक आणि सुरक्षा रक्षक राखीव | 310 आणि 180 पदे |
| पद क्र. ३ | सुरक्षा रक्षक अधिकारी | 124 पदे |
| | एकूण पदे | 614 पदे |

**शैक्षणिक पात्रता :**

| पद क्रमांक | पद नाव | पात्रता |
|---|---|---|
| पद क्र. १ व पद क्र. २ | सुरक्षा रक्षक, सुरक्षा रक्षक राखीव | किमान १० वी पास ते पुढे |
| पद क्र. ३ | सुरक्षा रक्षक अधिकारी | किमान १२ वी पास व २ वर्ष सुरक्षा क्षेत्रात अनुभव किंवा पदवी |

**शारीरिक पात्रता:**

| पद क्रमांक | पद नाव | पात्रता |
|---|---|---|
| पद क्र. १, पद क्र. २ आणि पद क्र. ३ | सुरक्षा रक्षक, सुरक्षा रक्षक राखीव आणि सुरक्षा रक्षक अधिकारी | १. उंची १६२ से.मी. पेक्षा कमी नसावी २. वजन ५० कि. पेक्षा कमी नसावे<br>३. छाती न फुगवता ७५ से.मी. वा जास्त. फुगवून किमान ४ से. मी.<br>४. धावणे १६०० मीटर |

**वयोमर्यादा:**

| पद क्रमांक | पद नाव | वयोमर्यादा | वयात सुट |
|---|---|---|---|
| पद क्र. १ व पद क्र. २ | सुरक्षा रक्षक, सुरक्षा रक्षक राखीव | १८ ते २७ वर्षे | NCC, कॅडेट , X सर्व्हिस मॅन आर्मी पोलिस, किंवा इतर सुरक्षा क्षेत्र किंवा इनवेस्टिगेशन एजन्सीज, ४ वर्ष वाढवून. = ३१ वर्ष पर्यंत, |
| पद क्र. ३ | सुरक्षा रक्षक अधिकारी | १८ ते ३४ वर्षे | NCC, कॅडेट , X सर्व्हिस मॅन आर्मी पोलिस, किंवा इतर सुरक्षा क्षेत्र किंवा इनवेस्टिगेशन एजन्सीज, ४ वर्ष वाढवून. = ३८ वर्ष पर्यंत, |

वेतन:

| पद क्रमांक | पदाचे नाव | वेतन - |
|---|---|---|
| पद क्र. १ व पद क्र. २ | सुरक्षा रक्षक, सुरक्षा रक्षक राखीव | २२००० ते ३८०००+ इतर भत्ते |
| पद क्र. ३ | सुरक्षा रक्षक अधिकारी | २६००० ते ४५००० + इतर भत्ते |

टीप' : नोकरीमध्ये इतर भत्ते, नोकरी योग्यता व ठिकाण यानुसार पेट्रोल/ प्रवास भत्ता/ राहणे / जेवण / वर्दी यानुसार असु शकतो.

१. भरती प्रक्रियेत पद क्र. १ व पद क्र. २ यांची भरती प्रक्रिया आणि निवड प्रक्रिया एकत्र होईल, तर पद क्र. ३ याची भरती प्रक्रिया वेगळी होईल. भरती प्रक्रियेतीलपद क्र. १ व पद क्र. २ एकत्र असतील, आणि पद क्र. ३ वेगळ्या वेळी होईल. त्यामुळे उमेदवारांना दोन्ही पदांसाठी, म्हणजे पद क्र. १ व पद क्र. २ एकत्र तसेच पद क्र. ३ साठी स्वतंत्रपणे फॉर्म भरता येतील.
२. वरील प्रमाणे पद क्र. १, पद क्र. २ आणि पद क्र. ३ साठी भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. अर्ज भरण्याची अंतिम तारीख १५ मार्च २०२५ आहे. फार्म भरल्या नंतर, पुढील कार्यवाहीसाठी आपल्याला अधिकृत वेबसाईट, ईमेल आणि आपला दुरध्वनी क्रमांक वर अपडेट दिले जातील. यामार्फत परीक्षेचे हॉल तिकीट, परीक्षेची लोकेशन, लेखी आणि ग्राउंड परीक्षेची माहिती तसेच निकाल व इतर संबंधित तपशील समाविष्ट असतील. कृपया दिलेल्या माहितीचे अनुसरण करा.
३. वरिल प्रमाणे अधिकृत रित्या ४०२ पेक्षा जास्त जागा भरल्या जाणार आहेत त्यानुसार योग्य पदासाठी योग्य उमेदवार अर्ज करु शकतात.
४. उमेदवार दोन स्वतंत्र फॉर्म भरु शकतात, एक पद क्र. १ आणि पद क्र. २ साठी, आणि दुसरा पद क्र. ३ साठी.

**नोकरीचे स्वरूप:**

नॅशनलिस्ट डिटेक्टिव्ह फोर्स अंतर्गत विविध सुरक्षा संबंधित क्षेत्रांमध्ये , मिळालेल्या करारानुसार जसे की वैयक्तिक सुरक्षा, सुरक्षा रक्षक, सुरक्षा अधिकारी, तपास अधिकारी इत्यादी पदांवर नोकरी उपलब्ध असू शकते. ही नोकरी संपूर्ण महाराष्ट्र आणि भारतभर उपलब्ध असू शकते.

**अभ्यासक्रम आणि परीक्षेचे स्वरूप:**

लेखी परीक्षा आणि मैदानातील परीक्षा सोप्या आणि सहज पद्धतीने घेतल्या जातील, जशा की महाराष्ट्र सुरक्षा बल (MSF), होमगार्ड भरती, पोलिस भरती किंवा आर्मी भरतीच्या पद्धतीने. भरती प्रक्रियेत उमेदवारांच्या इतर कौशल्ये आणि प्रमाणपत्रांचा सुद्धा विचार केला जाईल. भरती प्रक्रिया अत्यंत सोपी असेल आणि कमी मेरिट लिस्ट लागू होऊ शकते.

**निवड प्रक्रिया माहिती:**

**१. लेखी वस्तुनिष्ठ परीक्षा: सर्व पदांसाठी**

| विभाग नाव | एकूण प्रश्न | एकूण गुण | कालावधी |
|---|---|---|---|
| गणित | २५ प्रश्न | २५ गुण | ९० मिनिटे |
| बौद्धिक चाचणी | २५ प्रश्न | २५ गुण | |
| मराठी व्याकरण | २५ प्रश्न | २५ गुण | |
| सामान्य ज्ञान आणि चालू घडामोडी | २५ प्रश्न | २५ गुण | |
| एकूण | १०० प्रश्न | १०० गुण | |

लेखी वस्तुनिष्ठ परीक्षा ही बहुपर्यायी परीक्षा असणार आहे, ज्यामध्ये तुम्हाला चार पर्यायांपैकी एक योग्य उत्तर निवडायचे आहे. ही परीक्षा संगणकावर घेतली जाऊ शकते किंवा पेपरवरही होऊ शकते. परीक्षा तारीख जाहीर झाल्यानंतर, या संदर्भातील सविस्तर माहिती अधिकृत संकेतस्थळावर किंवा तुमच्या ईमेलवर उपलब्ध होईल.

**२. शारीरिक पात्रता: सर्व पदांसाठी**

| पद क्रमांक | पद नाव | पात्रता |
|---|---|---|
| पद क्र. १, पद क्र. २ आणि पद क्र. ३ | सुरक्षा रक्षक, सुरक्षा रक्षक राखीव आणि सुरक्षा रक्षक अधिकारी | १. उंची १६२ से.मी. पेक्षा कमी नसावी २. वजन ५० कि. पेक्षा कमी नसावे ३. छाती न फुगवता ७५ से.मी. वा जास्त. फुगवून किमान ४ से. मी. (Expansion) ४.धावणे १६०० मीटर |

शारीरिक पात्रता तपासणीसाठी तुम्हाला वरील दिलेल्या माहितीनुसार पात्र असणे आवश्यक आहे. निवड प्रक्रिया मेरिटनुसार केली जाईल. या संदर्भातील सविस्तर माहिती शारीरिक पात्रता परीक्षा तारीख जाहीर झाल्यानंतर अधिकृत संकेतस्थळावर आणि तुमच्या ईमेलवर उपलब्ध होईल.

**परिक्षा केंद्र व शारीरिक चाचणी वेळी नीयम:**

१. उमेदवारांनी आपल्या नातेवाईकांना परीक्षा केंद्रावर किंवा शारीरिक पात्रता केंद्रावर नेऊ नये. केंद्राबाहेर त्यांना थांबणे बंधनकारक असेल. तसेच, उमेदवारांनी इतर कोणत्याही व्यक्तीला परीक्षा केंद्रावर आगोदर येण्याची परवानगी देऊ नये.
२. उमेदवाराने परीक्षा दिवशी वेळेत परीक्षा ठिकाणी हजर न राहिल्यास, त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी मिळणार नाही.
३. उमेदवाराने परीक्षा केंद्रावर येताना राहण्याची, जेवण, प्रवास खर्च यांची व्यवस्था स्वतःच केली पाहिजे.
४. परीक्षेसाठी निळा किंवा काळा पेनचाच वापर अनिवार्य आहे. इतर रंगाचे पेन वापरणे कठोरपणे टाळा.
५. परीक्षेची तयारी आणि वेळ जाहीर झाल्यावर, उमेदवाराने परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू होण्याच्या किमान 30 मिनिटांपूर्वी उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिराने आलेल्यांना प्रवेश दिला जाणार नाही.
६. परीक्षा केंद्रावर उमेदवाराने प्रामाणिक व शिस्तबद्ध वर्तन करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या गडबडी, गैरवर्तन किंवा अन्य अनुशासनहीन वर्तनामुळे उमेदवाराला निवड प्रक्रियेतून त्वरित बाहेर काढले जाऊ शकते. यासाठी योग्य कायदेशीर कार्यवाही केली जाईल.
७. परीक्षेला येताना तुमचं हॉल तिकीट आणि ओळखपत्र (आधार कार्ड / मतदान कार्ड) सोबत आणणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.
८. हॉल तिकीटाची रंगीत प्रिंट काढावी, ज्यामध्ये तुमचा फोटो स्पष्टपणे दिसला पाहिजे.
९. परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक उपकरणे (मोबाइल फोन, स्मार्टवॉच, लॅपटॉप, हेडफोन, इत्यादी) आणण्यास मनाई आहे. या उपकरणांचा वापर करणार्या उमेदवारांना निवड प्रक्रियेतून बाहेर काढले जाईल.
१०.फॉर्म भरताना कोणत्याही चुकांबद्दल संबंधित पुरावे किंवा माहिती परीक्षा केंद्रावर प्रामाणिकपणे सबमिट करावी.

**परीक्षा शुल्क*** :

- पद क्र. १ व पद क्र. २ एकत्र = ४४९/- रु.
- पद क्र. ३ = ४४९/- रु.

**निवड / पात्रता निकष:**

नॅशनलिस्ट डिटेक्टिव्ह फोर्स सुरक्षा रक्षक भरतीसाठी उमेदवाराचे किमान शिक्षण १० वी उत्तीर्ण असावे. जर तुमच्याकडे डिप्लोमा किंवा पदवी असली, तरीही तुम्ही भरतीसाठी पात्र आहात. उमेदवाराला कोणतीही मानसिक किंवा शारीरिक अपंगत्व नसावे. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केले आहेत आणि त्यांना मोबाईल वरती संदेश (Message) आला आहे किंवा तुमचे नाव अधिकृत वेबसाइट वरच्या यादीमध्ये आलेले आहेत त्यांनीच अधिकृत वेबसाईट वर दिलेल्या पत्त्यावर जायच आहे. जाताना अर्जाची स्पष्ट प्रिंट आणि कागदपत्रे तसेच प्रवेशपत्र इत्यादी गोष्टी सोबत घेवून जायची आहेत. दिलेल्या निकषांनुसार, एकूण गुण आणि आवश्यक सर्व बाबींचा तपास करून, निवड समितीचा निर्णय/निकाल अंतिम असेल.

**निकाल** :

**पद क्र. १ व पद क्र. २:** एकत्र भरती प्रक्रिया, निवड प्रक्रिया समान

**पद क्र. ३:** वेगळी निवड प्रक्रिया

**नॅशनॅलिस्ट डिटेक्टिव्ह फोर्स भरती साठी आवश्यक, कागदपत्रे* :**

| | | |
|---|---|---|
| १) | मोबाईल क्रमांक | नियमीत सूचना प्राप्त करण्यासाठी वैध मोबाईल क्रमांकाची अर्जावर नोंद करणे अनिवार्य आहे. आपल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे नियमित सूचना पाठविल्या जातील. |
| २) | आधार क्रमांक | उमेदवारांनी अर्ज भरताना स्वतःचे आधार कार्ड क्रमांक अचूक नमुद करणे अनिवार्य आहे. |
| ३) | कागदपत्रे - १ | इयत्ता १२ वी (HSC) उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र |
| ४) | कागदपत्रे - २ | इयत्ता १० वी (SSC) उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र |
| ५) | कागदपत्रे - ३ | अधिवास प्रमाणपत्र [महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचे] |
| ६) | कागदपत्रे - ४ | आधारकार्ड |
| ७) | कागदपत्रे - ५ | पॅनकार्ड |
| ८) | कागदपत्रे - ६ | जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र |
| ९) | कागदपत्रे - ७ | वाहन चालवण्याचा परवाना (असल्यास) |
| १०) | प्रवेश शुल्क | प्रत्येकी ४४९/- रुपये मात्र |

**महत्वाच्या तारखा:**

| | |
|---|---|
| जाहिरात दि. | १२ फेब्रुवारी २०२५ |
| अर्ज भरण्याची सुरुवात दि. | १५ फेब्रुवारी २०२५ |
| अर्ज भरण्याची शेवटची दि. | ~~१५ मार्च २०२५~~ |

**२० एप्रिल २०२५**

**अटी व शर्ती :**

१. **फौजदारी गुन्हे आणि आरोप:** अर्जदाराच्या विरुद्ध कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसावा. गंभीर आरोप, खटले, किंवा संबंधित मुद्दे असू नयेत.
२. **शारीरिक तंदुरुस्ती:** अर्जदार शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असावा. दीर्घकालीन आणि गंभीर शारीरिक आजार जसे की हृदयविकार, मधुमेह, किंवा श्वसनाचे विकार नसावे.
३. **मानसिक आरोग्य:** अर्जदार मानसिकदृष्ट्या सक्षम असावा आणि कोणत्याही मानसिक विकारांचा सामना करत नसावा. मानसिक शांती आणि स्थिरतेचा अभाव नोकरीच्या कार्यक्षमतेवर नकारात्मक परिणाम करू शकतो.
४. **वयाची मर्यादा:** अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ३४ वर्षांपर्यंत असावे. काही संस्थान आणि पदांसाठी वयाची मर्यादा जास्त किंवा कमी होऊ शकते.
५. **शिक्षणाची पात्रता:** अर्जदार किमान १०वी पास असावा. काही पदांसाठी उच्च शिक्षणाची आवश्यकता असू शकते. शिक्षणाची अटी संस्थेच्या आवश्यकतेनुसार बदलू शकतात.
६. **सुरक्षा सेवेमध्ये अनुभव:** सुरक्षा क्षेत्रातील अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. आधीच्या कार्यानुभवामुळे उमेदवाराची कार्यक्षमता आणि क्षमता सिद्ध होऊ शकते.
७. **शिस्तप्रियता आणि विश्वासार्हता:** अर्जदार शिस्तप्रिय, जबाबदारीने वर्तन करणारा आणि विश्वासाई असावा. कामाच्या ठिकाणी व्यावसायिक आचारधारांचा पालन करणे आवश्यक आहे.
८. **पार्श्वभूमी सत्यापन:** अर्जदाराचे आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, पोलिस व्हेरिफिकेशन प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक कागदपत्रे असू शकतात, जे उमेदवाराची ओळख आणि पार्श्वभूमी सत्यापित करण्यासाठी आवश्यक आहेत

**भरती प्रक्रिया:**

१. **भरतीची प्रक्रिया:** अर्ज भरण्यानंतर, भरती प्रक्रिया जलद पार पडेल. योग्य वेळी तपशीलवार माहिती दुरध्वनी क्रमांक, ईमेल किंवा अधिकृत वेबसाईटवर दिली जाईल.
२. **लेखी व शारीरिक परीक्षा:** लेखी आणि शारीरिक (ग्राउंड) परीक्षेचे निकाल अधिकृत वेबसाईटवर तसेच दुरध्वनी किंवा ईमेलद्वारे दिले जातील.
३. **डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन:** निकाल जाहीर झाल्यानंतर डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन प्रक्रिया सुरू होईल. पोलिस व्हेरिफिकेशन आवश्यक असल्यास ते पूर्ण करणे अनिवार्य असू शकते.
४. **प्रशिक्षणाची तारीख आणि स्थान:** प्रशिक्षणाची तारीख व ठिकाण संबंधित माहिती योग्य वेळी उमेदवाराला मोबाईल क्रमांक, ईमेल किंवा अधिकृत वेबसाईटवर दिली जाईल.
५. **वैद्यकीय चाचणी:** प्रशिक्षणासाठी वैद्यकीय चाचणी अनिवार्य असू शकते, ज्यात शारीरिक तंदुरुस्तीच्या विविध तपासण्यांचा समावेश असेल.
६. **मानसिक व शारीरिक पात्रता:** उमेदवार मानसिक व शारीरिक दृष्ट्या सक्षम असावा. कोणत्याही मानसिक विकाराच्या स्थितीत असलेल्या उमेदवारांना प्रशिक्षणासाठी पात्र ठरवले जाणार नाही.
७. **प्रशिक्षणासाठी अनुपस्थिती:** जर उमेदवार प्रशिक्षणाच्या तारखेला अनुपस्थित राहिले, तर त्यांचे स्थान राखिव उमेदवारास देण्यात येईल.
८. **रहाण्याची व जेवणाची व्यवस्था:** प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांच्या रहाण्याची, जेवणाची आणि इतर आवश्यक गोष्टींची जबाबदारी प्रशिक्षण समितीची असेल.
९. **चुकिची माहिती किंवा डॉक्युमेंट्स:** चुकिची माहिती किंवा डॉक्युमेंट्स सादर करणाऱ्याला प्रशिक्षण केंद्रावरून त्वरित बाहेर काढले जाईल.
१०. **गैरवर्तन:** प्रशिक्षणादरम्यान गैरवर्तन करणाऱ्याला प्रशिक्षणापासून वगळले जाईल.
११. **प्रशिक्षण शुल्क व डॉक्युमेंट:** प्रशिक्षण सुरू होण्यापूर्वी, उमेदवाराने प्रशिक्षण शुल्क व सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.
१२. **प्रशिक्षणाचे तपशील:** प्रशिक्षण कालावधी, शुल्क, स्थान, विषय इत्यादी तपशील निकाल जाहीर झाल्यानंतर अधिकृत वेबसाईट, ईमेल आणि मोबाईल क्रमांकावर पाठवले जातील.
१३. **शिफ्ट ड्युटी:** प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना शिफ्ट ड्युटी आणि अतीरिक्त वेळ काम करण्यासाठी तयार असावे लागेल.
१४. **निवड समितीचा निर्णय:** परीक्षेचे निकाल, प्रशिक्षण प्रक्रिया, आणि निवड यासंबंधी अंतिम निर्णय निवड समिती आणि प्रशिक्षण समितीचा असेल.
१५. **अधिकृत सूचना आणि मार्गदर्शन:** अधिकृत सूचना व मार्गदर्शनासाठी, कृपया अधिकृत वेबसाइट, ईमेल आणि मोबाईल नंबरवर वेळोवेळी तपासणी करा
१६. **पदाच्या जागा कमी किंवा जास्त होऊ शकतात;** भरती प्रक्रियेतील दिलेल्या पदाच्या जागा कमी किंवा जास्त होऊ शकतात. या संदर्भात सर्व अधिकार भरती प्रक्रिया समितीकडे राखीव राहतात.
१७. **उमेदवाराला बाद करू शकतात.** भरती प्रक्रिया आणि प्रशिक्षण वेळेस उमेदवाराने चुकिचा वर्तन किंवा कामगिरी केल्यास, समितीकडे अधिकार असतील की, कोणत्याही वेळी, कोणत्याही पातळीवर उमेदवाराला बाद करू शकतात.
१८. **प्रशिक्षण शुल्क:** भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि निकाल जाहीर झाल्यावर, प्रशिक्षण व इतर खर्च शुल्क म्हणून १९,८०० रुपये आणि सुरक्षा ठेव म्हणून ५,००० रुपये भरावे लागतील. यामधील १९,८०० रुपये हे नॉन-रिफंडेबल असतील, तर ५,००० रुपये हे रिफंडेबल असतील आणि ते तुम्ही तुमचा एक वर्षाचा करार कालावधी पूर्ण केल्यानंतर परत प्राप्त करू शकाल.

***वरील प्रमाणे नॅशनलिस्ट डिटेक्टिव्ह फोर्स अंतर्गत 2025 साठी भरती प्रक्रिया होत आहे.***
***तुमच्या समस्या व शंका यांचे निवारण करण्यासाठी हेल्पलाईन नंबर 8007341905 वर संपर्क साधणे.***

**श्री. एन. पाटिल.**
**निवड व प्रशिक्षण अधिकारी**
**नॅशनलिस्ट डिटेक्टिव्ह फोर्स**

NATIONALIST DETECTIVE FORCE
NDF
PUNE
MAHARASHTRA

**SNDF SUPPORT SERVICES PVT LTD**
**DIRECTOR**
**श्री. ए .जाधव**
**डायरेक्टर**
**नॅशनलिस्ट डिटेक्टिव्ह फोर्स**